**Janata Sahakari Bank Ltd., Pune**

(Multi-State Scheduled Bank)

Office of Chief Compliance Officer, HO

Mobile No. 9970800377, e-mail: cco@janatabankpune.com

प्रती,

मान्यवर सभासद व खातेदार,

सप्रेम नमस्कार,

भारतीय रिझर्व्ह बँकेस ९० वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने, रिझर्व्ह बँकेने भारतातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी (पदवीपूर्व स्तरावरील) एक देशव्यापी प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित केलेली आहे.

ही एक महाविद्यालयीन विद्यार्थांसाठी सामान्य ज्ञानावर आधारित बहु-स्तरीय ऑनलाइन स्पर्धा आहे. स्पर्धेचा सुरवातीचा टप्पा यशस्वीपणे पार करणाऱ्या विद्यार्थास पुढे राज्य आणि विभागीय स्तरावरील फेऱ्या पूर्ण करून राष्ट्रीय स्तरावरील अंतिम फेरीत सहभागी होण्याची व रोख पारितोषक प्राप्त करण्याची संधी मिळेल.

दि. २० ऑगस्ट २०२४ रोजी या स्पर्धेचा शुभारंभ करताना, भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर श्री. शक्तीकांता दास यांनी महाविद्यालीन शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना भारतीय रिझर्व्ह बँक, डिजीटल व्यवहार व आर्थिक क्षेत्राची माहिती करून घेण्याकरिता या स्पर्धा उपक्रमाचा उपयोग करून घ्यावा असे आवाहन केले आहे.

या स्पर्धेत भाग घेणाऱ्या सर्व स्पर्धकांना सहभागिता प्रमाणपत्र मिळणार आहे. तसेच विविध स्तरावर यश प्राप्त करणाऱ्या संघास आकर्षक रोख बक्षिसेही आहेत. सहभागी होण्याकरिता कोणतेही शुल्क नाही.

| पातळी | प्रथम | द्वीतीय | त्रितीय |
|---|---|---|---|
| अंतिम | १० लाख | ८ लाख | ६ लाख |
| झोनल स्तरीय | ५ लाख | ४ लाख | ३ लाख |
| राज्य स्तरीय | २ लाख | १.५० लाख | १ लाख |

सप्टेंबर २०२४ पासून चालू होणाऱ्या या स्पर्धेत भाग घेण्यासाठी कृपया www.rbi.org.in या वेबसाईटवर भेट द्यावी. किंवा खालील QR Code स्कॅन करावा.

बँकेच्या सर्व सभासद व खातेदारांस नम्र विनंती की आपल्या परिवारातील महाविद्यालयीन शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना वरील स्पर्धेत भाग घेण्याविषयी प्रोत्साहित करावे.

धन्यवाद !

**(जगदीश कश्यप),**
मुख्य कार्यकारी अधिकारी
जनता सहकारी बँक लि., पुणे

Website : https://www.rbi90quiz.in/

For Urgent Queries Call : +91-9769764157

Or mail to : contact@rbi90quiz.in